ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 242-M (NS)**
**Code No. : 242-M (NS)**

# ಡಿ.ಇಡಿ. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ
# D.Ed. SECOND YEAR

ಶಿಕ್ಷಣ
## EDUCATION

# ರೂಢಿಯಾಗಿ ಶಿಕ್ಷಣ
# EDUCATION AS PRACTICE

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)
( Marathi Version )

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**
**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 17. 05. 2019 ]
Date : 17. 05. 2019 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ]
Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ]

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
[ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

**भाग - I**

खालील प्रत्येक प्रश्नाला **चार** पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य उत्तराची निवड करा आणि उत्तर-पुस्तिकेमध्ये लिहा. सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे सक्तीचे आहे. 10 × 1 = 10

1. डिवीच्या ( Dewey ) कल्पना आत्मसात करून अध्यापनासाठी परावर्तित सराव मिळविलेली व्यक्ती ही आहे.

   (A) रॉबर्ट गॅने ( Robert Gagne ) (B) गिबस् ( Gibbs )

   (C) जॉनसन ( Johnson ) (D) अँड्रयू पोलार्ड ( Andrew Pollard ).

2. मुलांच्या अनुभवाना, त्यांच्या प्रतिक्रियांना आणि त्यांच्या उत्स्फुर्त सहभागाला प्राधान्य देणारे अध्यापनशास्त्र हे आहे.

   (A) कृती आधारीत अध्ययन (B) बाल केंद्रित अध्यापनशास्त्र

   (C) चिकीत्सक अध्यापनशास्त्र (D) पारंपरिक अध्यापन पद्धत.

3. व्यक्तीला जोरदारपणे इतरापासून वेगळे बनविणारे घटक हे आहेत.

I. न विचारता सुद्धा इतरांना मदत देणे
II. इतरांना जसे आहेत तसे स्वीकारणे
III. इतरांसोबत संवेदनशीलता विकसित करणे
IV. इतरांच्या भावना आणि गरजा जाणून घेणे.

ह्या पैकी :

(A) III आणि IV (B) I, III आणि IV
(C) I, II आणि III (D) II आणि III.

4. NCF 2005 च्या मते मुलांच्या ज्ञान रचनेतील अडथळा हा आहे.

(A) पाठांतर ( तोंडपाठ ) (B) प्रश्न विचारणे
(C) स्व-परावर्तन (D) सहकारी अध्ययन.

5. रॉबर्ट गॅने ( Robert Gagne ) च्या सूचनात्मक रचनेच्या मांडणीची योग्य प्रक्रिया ही आहे.

(A) पथःकरण, रचना, अमलात आणणे, विकास, मौल्यमापन
(B) पृथःकरण, रचना, विकास, अमलात आणणे, मौल्यमापन
(C) रचना, पृथःकरण, विकास, अमलात आणणे, मौल्यमापन
(D) मौल्यमापन, रचना, अमलात आणणे, विकास, पृथःकरण.

6. खालीलपैकी कोणते सृजनशील विचार कौशल्याचा घटक नाही ?

(A) विचलित विचार (B) नाविन्यता
(C) नवीनपणा (D) स्व-जागृती.

7. नैसर्गिक अध्ययन वातावरण निर्मितीसाठी सूचनात्मक रचनेसाठी आत्मसात करण्यायोग्य निती या आहेत.

I. मुक्त शिक्षण पद्धती
II. सहकारी अध्ययनासाठी वाव देणे
III. फक्त शिक्षकांनी मौल्यमापन कार्य करणे
IV. अध्ययन कर्त्याने निवडलेले कार्य.

ह्या पैकी :

(A) I, II आणि IV (B) II आणि III
(C) II आणि IV (D) I, II आणि III.

8. वस्तुरूपातील साधनाचे उदाहरण हे आहे.

(A) संगणक (B) परिसर
(C) शिक्षक (D) समुदाय.

9. शालेय विकासासाठी खालीलपैकी कोणते चिकीत्सक आह ?
   (A) सेवक वृंदाची भरती
   (B) सेवक वृंदाचे स्व-अध्ययन
   (C) सेवक वृंदाचे सहकारीत्व
   (D) सेवक वृंदाला पुरविलेल्या सुविधा.

10. 'दडपणाशिवाय अध्ययन' शिफारस केलेला अहवाल यांचा आहे.
   (A) कोठारो आयोग
   (B) सायमन अहवाल
   (C) वुडचा ( Woods ) अहवाल
   (D) यशपाल समिती अहवाल.

## भाग - II

खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : 5 × 2 = 10

11. 'भाषेमुळे ज्ञानात्मक विकासाला आकार मिळतो.' या विधानाचे थोडक्यात वर्णन करा.

12. पारंपरिक वर्गखोली आणि समावेशक अध्ययन स्नेही वर्गखोली यामधील कोणतेही दोन फरक लिहा.

13. परावर्तित अध्यापनाची महत्वाची दोन तत्वे सांगा.

14. विद्यार्थ्यामध्ये समस्या-निवारण कौशल्ये तुम्ही कशी विकसित कराल ?

15. एक उत्तम शालेय पंचांग कोणते घटक निर्धारित करते ?

16. एका चिकित्सक विचारकर्ताच्या कोणत्याही दोन गुणांचे ( qualities ) वर्णन करा.

17. अध्ययन साधनांचा वापर निर्धारित करणारे कोणतेही दोन घटक स्पष्ट करा.

18. शिक्षक चतुर असणे गरजेचे का आहे ?

## भाग - III

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्यायो प्रश्न दिलेला आहे. त्यापैकी (a) किंवा (b) या एकाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये : 8 × 5 = 40

19. (a) बाल केंद्रित अध्यापनशास्त्र म्हणजे काय ? या पद्धतीची महत्वाची वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

   (b) चिकित्सक अध्यापनशास्त्रातील शिक्षकाच्या भूमिकेचे वर्णन करा.

20. (a) "शाळा एक संघटना ( संस्था ) आहे." पृथःकरण करा.

**किंवा**

   (b) "शालेय शिक्षकाच्या व्यावसायिक विकासासाठी शाळा संधी पुरवितात." या विधानाचे स्पष्टीकरण करा.

21. (a) पारंपरिक वर्गखोली आणि रचनावादाची वर्गखोली यामधील पाच फरक लिहा.

**किंवा**

(b) शाळा व्यवस्थापन पद्धतीची प्रक्रिया लिहा. कोणत्याही दोन प्रक्रियेंचे थोडक्यात वर्णन करा.

22. (a) रॉबर्ट गॅने ( Robert Gagne ) च्या सूचनात्मक नमुना रचनेच्या प्रक्रियेची रचना तुम्ही कशी कराल ?

**किंवा**

(b) स्थान कागदाने मार्गदर्शक वर्गखोलीतील व्यवहारासाठी तुम्ही कशी मूलभूत तत्वे वापराल ?

23. (a) तुमच्या निवडीच्या पाठावर 5E नमुन्याची पाठ योजना तयार करा.

**किंवा**

(b) वर्गखोलीतील अध्यापन-अध्ययन स्थितीमध्ये फास ( scaffolding ) वापरून तुम्ही पाच अध्ययन स्थिती कशा निर्माण कराल ?

24. (a) अध्ययन साधनामध्ये काय आहे आणि काय नाही हे दर्शविणारी पाच घटकाची सारणी तयार करा.

**किंवा**

(b) तुम्ही निवडलेली अध्ययन साधने अत्युत्तम आहेत यासाठी स्व-परावर्तनामध्ये गुंतवून ठेवणारे पाच प्रश्न खात्रीसाठी रचा.

25. (a) विद्यार्थ्यामध्ये सृजनशोल विचार निर्माण करण्यासाठी तुम्ही कोणते योजनात्मक उपाय कराल ते स्पष्ट करा.

**किंवा**

(b) तुमच्या विद्यार्थ्यामध्ये निर्णय घेण्याचे कौशल्य तुम्ही कसे ओळखाल ? उदाहरणासह स्पष्ट करा.

26. (a) अध्ययन साधने म्हणजे काय ? अध्ययन साधने ओळखताना कोणते घटक आणि मानदंड लक्षात ठेवले पाहिजेत ते स्पष्ट करा.

**किंवा**

(b) तुमच्या निवडीच्या एका पाठासाठी कोणत्या प्रकारची वस्तुरूप साधने तुम्ही वापराल ?